दिवाळी सणाच्या अनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील राज्य शासकीय/ निमशासकीय कार्यालयांना दि.०९ नोव्हेंबर, २०२६ रोजी स्थानिक सुट्टी जाहीर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्र: सार्वसु-११२५/प्र.क्र.१९९/जपुक(२९)
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०६ नोव्हेंबर, २०२६

वाचा:-१) शासन परिपत्रक क्र.सार्वसु-११२५/प्र.क्र.१९९/जपुक(२९), दि.०९.१२.२०२५.
२) शासन परिपत्रक क्र.स्थानिसु-२०२६/प्र.क्र.१४०/जपुक(२९), दि.१०.०८.२०२६.

शासन परिपत्रक:

शासन परिपत्रक, दि.०९.१२.२०२५ अन्वये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय/ निमशासकीय कार्यालयांना गोपाळकाला (दहिहंडी) व अनंत चतुर्दशी निमित्ताने स्थानिक सुट्टी घोषित करण्यात आली होती. तद्नंतर शासन शुध्दीपत्रक दि.१०.०८.२०२६ अन्वये गोपाळकाला (दहिहंडी) दि.०५.०९.२०२६ रोजीची सुट्टी शनिवार साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी येत असल्याने सदर सुट्टी रक्षाबंधन दि.२८.०८.२०२६ रोजी जाहिर करण्यात आली होती. त्यानुसार सन २०२६ मध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय/ निमशासकीय कार्यालयांना दिवाळी सणाच्या अनुषंगाने **सोमवार दि.०९ नोव्हेंबर, २०२६** रोजी तिसरी स्थानिक सुट्टी (Local Holiday) जाहीर करण्यात येत आहे.

२. हे आदेश मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील राज्य शासकीय/ निमशासकीय कार्यालयांना लागू राहतील.

३. सदर स्थानिक सुट्टी शासन निर्णय क्र.पी ॲन्ड एस.नंबर पी-१३/II/बी, दि.०५ नोव्हेंबर, १९५८ मधील तरतूदीनुसार जाहीर करण्यात येत आहे.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६११०६१५५९२११००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ATUL NILKANTHRAO PATNE
Date: 2026.11.06 16:00:20 +05'30'

(अतुल पाटणे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा.राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक,

३. मा.सभापती/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे सचिव,
४. मा.उप सभापती/मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक व औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
९. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा यांचे स्वीय सहाय्यक,
१०.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्विय सहायक,
११.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२.प्रधान सचिव, (प्र.ना.उ. व सु.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३.सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा), मंत्रालय, मुंबई,
१४.* महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
१५.* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१६.मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१७.मुख्य आयुक्त, लोक सेवा हक्क आयोग, मुंबई
१८. * सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, १ ला मजला, मादाम कामा रोड, मुंबई,
१९.* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२०.* प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२१.* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२२. आयुक्त, कोकणभवन, नवी मुंबई,
२३. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,
२४. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई उपनगर,
२५. मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांखालील मुंबई शहर/मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व विभाग / कार्यालय प्रमुख,
२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२८. सचिव, राज्य माहिती आयोग, नविन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
२९.* महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
(त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आवश्यक ते प्रसिध्दीपत्रक निर्गमित करावे, तसेच आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे प्रसिध्दी द्यावी)
३०. निवड नस्ती / सामान्य प्रशासन विभाग-२९